पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
<u>कार्यपत्रिका क्रमांक : २</u>
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक : ०७ / ०५ / २०१२ वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा सोमवार, दिनांक - ०७ /०५ / २०१२ रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२. मा. ननवरे जितेंद्र बाबा
३. मा. सुपे आशा रविंद्र
४. मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५. मा. शितोळे शैलजा बाबुराव
६. मा. नेटके सुमन राजेंद्र
७. मा. विनोद जयवंत नढे
८. मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

याशिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.काळे - नगरसचिव, मा.कांबळे - शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.ढगे, मा.जाधव, मा.दुधेकर, मा.निकम, मा.इंगळे, मा.पठाण, मा.कुदळे, मा.चिंचवडे, मा.कुलकर्णी, मा.कपिले - कार्य. अभियंता, मा.माछरे - विशेष अधिकारी, मा.देव - लेखाधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.८ :- स्थापत्य विषयक कामांबाबत मा.आशा सुपे मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ :- नामकरण करणेबाबत मा.नितीन लांडगे मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०:- बंद पाईप गटर करणेचे कामातून रेल्वेचे जवळ काम करणेस मान्यता मिळणेबाबत मा.जितेंद्र ननवरे मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११:- मा. विधी समिती सभा आयोजनाबाबत मा.जितेंद्र ननवरे मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक ०६ / ०१ / २०१२, व ०२ / ०३ / २०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक १२ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १६ / ०४ / २०१२ रोजी झालेल्या पहिल्या सभेचा ( विशेष सभेचा ) (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :- ४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०७/०५/२०१२ विभाग- प्रशासन
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.धनंजय आल्हाट
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/१०४२/२०११ दि.२१/१२/२०११

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र नागरी सेवेमधील तरतूदीचा विचार करता डॉ.श्री. रोकडे पी.डी. यांची मनपामध्ये दिनांक १२/११/२०११ रोजी ४ वर्षाची प्रतिनियुक्तीवरील सेवा पूर्ण होत असल्याने डॉ.रोकडे यांचे शासन सेवेमध्ये प्रत्यावर्तन करणे आवश्यक आहे तथापि शासनाकडून पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत डॉ.रोकडे यांना मनपा सेवेमधून कार्यमुक्त न करता शासन मनपासाठी पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देईल त्या कालावधीपर्यंत डॉ.रोकडे यांना मान्यता व उर्वरित वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनवणे व डॉ.मदने यांना दिनांक २५/०८/२०११ पासून पुढे १ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०७/०५/२०१२ विभाग- प्रशासन
सुचक :- मा.धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/१६८/२०१२ दि.०३/०३/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावा सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे निवडणूक प्रभागांप्रमाणे सलगता विचारात घेवून अ, ब, क, ड प्रभागांमध्ये समाविष्ठ करावयाचे निवडणूक प्रभागाचे निश्चिती करण करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ६ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०७/०५/२०१२ विभाग - जकात
सुचक :- मा. धनंजय आल्हाट अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. जकात/१०/कावि/९९/२०१२ दि.१९/०३/२०१२

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाबाबत...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ७ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- ०७/०५/२०१२ विभाग - प्रशासन
सुचक :- मा.आशा सुपे अनुमोदक :- मा.सुमन नेटके
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/२६९/२०१२ दि.०७/०४/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नविन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावा सोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ८ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- ०७/०५/२०१२ विभाग- स्थापत्य उद्यान
सुचक :- मा.नितीन लांडगे अनुमोदक :- मा.शैलजा शितोळे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/जा/कावि/तां/०७/२०१२ दि.२६/०४/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभागात वृक्षारोपणा साठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणेकामी र.रु.२४,८८,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ९(अ) विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ०७/०५/२०१२ विभाग - लेखा
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/कावि/१२९३/२०१२ दि.२६/०४/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रकात नमुद केलेल्या रक्कम रु. ५०,००,०००/- पर्यंतच्या प्रस्तावा सोबतच्या यादीतील ( प्रपत्र - अ) कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ९(ब) विषय क्रमांक :- ६
दिनांक :- ०७/०५/२०१२ विभाग - लेखा
सुचक :- मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा.नितीन लांडगे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/६/कावि/१२९३/२०१२ दि.२६/०४/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रकात नमुद केलेल्या र.रु.५० लाखावरील प्रस्तावा सोबतच्या यादीतील ( प्रपत्र - ब ) कामांना प्रशासकीय मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १०
विषय क्रमांक :- ७
दिनांक :- ०७/०५/२०१२
विभाग - प्रशासन
सुचक :- मा.शैलजा शितोळे
अनुमोदक :- मा.आशा सुपे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/२८२/२०१२
दि.२७/०४/२०१२
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे सहाय्यक आयुक्त अभिनामाचे पदाची अर्हता निश्चित करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेतलेले विषय घेणेत आले-**

ठराव क्रमांक :- ११
विषय क्रमांक :- ८
दिनांक :- ०७/०५/२०१२
सुचक :- मा.आशा सुपे
अनुमोदक :- मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा.आशा सुपे मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव -

भोसरी येथील क प्रभागातील वॉर्ड क्र.१२, १३ (जुना) मधील स्थापत्य विषयक कामे प्रभाग क्र. ३१ (नविन) मध्ये करणेस, भोसरी येथील क प्रभागातील वॉर्ड क्र.१७ (जुना) मधील स्थापत्य विषयक कामे प्रभाग क्र.३२ (नविन)मध्ये व पुलाखाली आवश्यकतेनुसार करणेस तसेच, भोसरी येथील क प्रभागातील वॉर्ड क्र. २५, २६ (जुने) मधील स्थापत्य विषयक कामे प्रभाग क्र.३७ (नविन) मध्ये करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १२
विषय क्रमांक :- ९
दिनांक :- ०७/०५/२०१२
सुचक :- मा. नितीन लांडगे
अनुमोदक :- मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा.नितीन लांडगे मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव -

भोसरी गावातील उमदा तरुण श्री.रमेश नारद गुळवे हा माऊंट एव्हरेस्ट मोहिमेवर नुकताच गेलेला होता. दि.२० एप्रिल २०१२ रोजी त्याची मोहिम सुरु झ ााली होती. परंतु दुर्दैवाने त्याला तेथे २००० फुटांवर अपघात झाला व त्याचा त्यात मृत्यू दि.२८ एप्रिल २०१२ रोजी पुणे येथे सह्याद्री हॉस्पिटल या ठिकाणी

झाला. सदर कै. रमेश गुळवे हा भोसरीतील एक नामांकित गिर्यारोहक होता व सदर क्षेत्रात त्याचे पिंपरी चिंचवड शहरात भरीव योगदान आहे. सदर कै. रमेश गुळवे ह्याचे गिर्यारोहन क्षेत्रातील योगदान पाहता त्याचे नाव सदैव अजरामर राहण्यासाठी अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे उभारण्यात आलेल्या कृत्रिम गिर्यारोहन सराव भिंतीस त्यांचे नाव देण्यात येण्यासाठी योग्य ती कायदेशिर कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १३ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- ०७/०५/२०१२
सुचक :- मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक :- मा. आशा सुपे
संदर्भ :- मा.जितेंद्र ननावरे मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.३३ मध्ये बंद पाईप गटर करणेचे कामी निविदा क्र.३०/३-१०/११ व ३०/४-१०/११ अन्वये कामे चालू आहेत. नविन वॉर्ड क्र.४१ मध्ये रेल्वेचे जवळ बंद पाईप गटर पावसाच्या पुर्वी करणे आवश्यक असलेने निविदा क्र.३०/३-१०/११ व ३०/४-१०/११ मधून सदर नविन वॉर्ड क्र.४१ मध्ये बंद पाईप गटर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १४ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- ०७/०५/२०१२
सुचक :- मा. जितेंद्र ननावरे अनुमोदक :- मा. धनंजय आल्हाट
संदर्भ :- मा.जितेंद्र ननावरे मा.धनंजय आल्हाट यांचा प्रस्ताव -

मा.विधी समितीची पाक्षिक सभा यापुढे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या सोमवारी दुपारी २.०० ऐवजी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या शुक्रवारी दुपारी ३.०० वाजता आयोजित करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली-

सूचक :- मा.नितीन लांडगे अनुमोदक :- मा.जितेंद्र ननवरे

रमेश नारद गुळवे यांचे एव्हरेस्टच्या मोहिमेवर असताना दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

(उपस्थितांनी २ मिनिटे स्तब्ध उभेराहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **प्रसाद शेट्टी** )
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ७१० /२०१२
दिनांक - ०७/०५/२०१२ चे लगत

**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

प्रत-सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\१७२.१६.०.६७\e drive\Nagersachiv१\Vidhi-१२-१३ new\Vidhi Proceeding_२.doc